# विमा योजनेचे दस्तही आता ‘व्हॉट्सअ‍ॅप’वर

**व्यापार प्रतिनिधी, मुंबई**

**विमाधारकांना त्यांनी** खरेदी केलेल्या विमा योजनांचे दस्तऐवज ‘व्हॉटसअ‍ॅप’वर पाठवण्यास फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनीने सुरुवात केली आहे. भारतीय ग्राहकांसाठी ही अनोखी सुविधा आहे.

विमाधारकांना विमा दस्तऐवजांचे वितरण करण्यासाठी टपाल किंवा कुरियर या पारंपरिक साधनांच्या जोडीला व्हॉट्सअ‍ॅपसारख्या डिजिटल व्यासपीठाच्या वापरास विमा नियामकांनी परवानगी दिली असून, त्याची सुरुवात फ्युचर जनरलीकडून झाली आहे.

अनेकदा विमा खरेदीदार विमा घेताना त्यांनी दिलेल्या निवासाचा पुरावा म्हणून दिलेल्या पत्त्यावर वास्तव्य करतातच असे नाही. पुराव्यांच्या अभावी वास्तव्याचे ठिकाण आणि रहिवासाचे ठिकाण वेगवेगळे असते. अशा वेळी पारंपरिक पद्धतीने टपाल किंवा कुरियरद्वारे वितरित झालेला दस्तऐवज विमाधारकापर्यंत पोहोचतोच असे नाही.

विमा योजनेचा दस्तऐवज लवकरात लवकर विमा खरेदीदारापर्यंत पोहोचावा यासाठी ही आधुनिकीकरणाची कास धरली आहे, असे फ्युचर जनरली इंडिया इन्शुरन्स कंपनीचे व्यवस्थापकीय संचालक के. जी. कृष्णमूर्ती राव यांनी ‘लोकसत्ता’ला सांगितले.